लोकमत

## मेट्रो ३ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ भुयारीकरणाचा ३१वा टप्पा पार

# विमानतळाखालील बोगद्याचे काम पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क





मेट्रो ३ चे काम वेळेत पूर्ण करण्याचा प्रशासनाचा मानस आहे.

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे सोमवारी सीएसआयए टी-१ (आंतरदेशीय विमानतळ ) स्थानक येथे भुयारीकरणाचा ३१वा टप्पा पार पडला.

पॅकेज-६ च्या टेराटेक निर्मित तापी-१ या टनेल बोअरिंग मशीनद्वारे सहार ते सीएसआयए टी-१ (आंतरदेशीय विमानतळ)पर्यंतचे १.५ किमी अंतर ४४९ दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आले. यासाठी एकूण १०८० रिंग्सचा वापर करण्यात आला.

सीएसआयए टी-१(आंतरदेशीय विमानतळ) हे कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावरील सर्वात महत्त्वाचे स्थानक आहे. या स्थानकावरून दररोज एक लाखापेक्षा अधिक प्रवासी प्रवास करणे अपेक्षित आहे.

सीएसआयए टी-१ स्थानक आंतरराष्ट्रीय व आंतरदेशीय विमानतळांना जोडले जाणार आहे व त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची कोंडी कमी होण्यास मदत होईल, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले.

सीएसआयए टी-१ स्थानकाचे एकूण ५५ टक्के काम पूर्ण झाले आहे. सीएसआयए टी-१ (आंतरदेशीय विमानतळ), सीएसआयए टी-२ (आंतरराष्ट्रीय विमानतळ) व सहार रोड स्थानकांचा समावेश असलेल्या पॅकेज -६ चे एकूण ८५ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८७ टक्के भुयारीकरण व ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.

सध्या एकूण ७ टीबीएमद्वारे विविध भागात भुयारीकरण सुरू असून येत्या काही महिन्यात आणखी काही भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण होणे अपेक्षित आहे.